# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०१/२०२५ (शनिवार) सकाळ**


### सावनेर–कळमेश्वर पोलीस महा. मॅरेथान २०२५ एक धाव जागरूकतेसाठी

सावनेर येथील किडा ग्राउंड सावनेर येथे आज दि १८/०१/२०२५ रोजी सकाळी ६.०० ते ११.०० वा. पर्यत सावनेर उपविभागा अंतर्गत **सावनेर– कळमेश्वर पोलीस महामॅरेथान २०२५ एक धाव जागरूकतेसाठी** मॅरेथान स्पर्धा घेण्यात आली. सदर मॅरेथान स्पर्धा ग्रामीण नागरीकांमध्ये जनजागृती करण्यासाठी, सायबर काईम, महिला विरुध्द घडणारे गुन्हे, डायल ११२, डायल १९३०, रस्ते सुरक्षा, पोलीस काका/पोलीस दिदि, नशामुक्ती, नवीन कायदयांचे ज्ञान प्राप्त व्हावे तसेच लहान मुलामुलींना पोलीस जवळचे वाटावेत या अनुषंगाने मॅरेथान घेण्यात आली आहे.

सदर स्पर्धे मध्ये १) ३ कि.मी. १३ वर्ष वयोगटापर्यंत मुला मध्ये प्रथम हर्ष ढोबळे, दुसरा लक्ष पटेल, तिसरा नैतिक बगमार तसेच मुली प्रथम श्रावणी लसंते, दुसरी गार्गी सतकार, तिसरी जाणवी कातरमल २) ३ कि.मी.– ५० वर्ष व त्यावरील प्रथम घनश्याम पद्मगिरवार, दुसरे चंदु भोंगाडे, तिसरे नागोराव भोयर तसेच महिला श्रीमती शारदा भोयर ३) ५ कि.मी. –१४ वर्षे व १७ वर्षापर्यत पहिले प्रणय उपासे, दुसरे प्रदुण्य खोडे, तिसरे आदित्य नागेश्वर, मुली पहिली जाणवी बावणे, दुसरी हिमांशी बावणे, तिसरी मानसी काठोके ४) १० कि.मी.– १८ वर्षे व त्यावरील पुरुष प्रथम राजन यादव, दुसरे सौरव तिवारी, तिसरे कुनाल वाघ तसेच महिला प्रथम प्राजक्ता गोडबोले, दुसरी रिया धोतरे, तिसरी मीताली भोयर या प्रमाणे स्पर्धकांना रोख पारीतोषीक देण्यात आले.

सदर स्पर्धा ही जनजागृती करण्यासाठी घेण्यात आली असुन ग्राउंडमध्ये जागृतीसाठी फ्लॅग लावण्यात आले होते. त्यावेळी सावनेर, कळमेश्वर, केळवद, खापा परीसरातील खेळाडु व नागरीक सदर स्पर्धेत भाग घेण्यास व पाहण्यास आले होते.

स्पर्धेच्या उद्घाटनास मा. श्री आशिषबाबु देशमुख आमदार सावनेर विधानसभा क्षेत्र, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलिस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री एस.आर. भरड दिवाणी न्यायाधीश सावनेर, मा. श्री एस. के. सरदार दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्थर सावनेर, मा. श्रीमती एन. व्ही. रणधिर न्यायाधिश सावनेर, मा. श्री आर. एल. राठोड न्यायाधिश कळमेश्वर, मा. श्रीमती एस.एम. गाडे न्यायाधिश सावनेर, श्री अनिल म्हस्के सहायक पोलिस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर, श्रीमती पुजा गायकवाड पोलीस उप अधिक्षक आर्थिक गुन्हे शाखा ना.ग्रा., श्री रविंद्र मानकर पोलीस निरिक्षक सायबर सेल, श्री अजय मानकर वेलफेअर शाखा, श्री ओमप्रकाश कोकाटे गुन्हे शाखा हे हजर होते. मान्यवरांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

श्री अनिल म्हस्के सहायक पोलिस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर व मा.श्री उमेश पाटील पोलीस निरिक्षक सावनेर श्री मनोज काळबांडे पोलीस निरिक्षक कळमेश्वर, श्री विशाल

गिरी पोलीस निरिक्षक खापा, श्री अनिल राउत सपोनि केळवद यांचे उपस्थिती मध्ये पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.














पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर